स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२५–२६/१९० दि. ११/०८/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : “एकात्म मानवदर्शन” या हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत…
संदर्भ : १.क्र.:उशिसं/मवि–१/एकात्म मा.दर्शन हि.महो/२०२५/ई.२०३९५२९,दि.०६/०८/२०२५चे पत्र
२.मा.कुलसचिव यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र जावक क्र.४९४२ दि.०९/०८/२०२५ अग्रेषित

महोदय,

मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वरिल संदर्भ क्र. १ पत्रानुसार युवा वर्गाच्या सक्षम व प्रभावी सहभागावर सामर्थ्यशाली राष्ट्राची निर्मिती अवलंबून असते. जगभरात सर्वात जास्त युवा वर्ग असणाऱ्या भारत देशातील युवा वर्गास त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणे व त्यांना राष्ट्रनिर्माण कार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. याच जाणिवेतून पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी प्राचीन भारतीय तत्वज्ञानावर आधारित “एकात्म मानवदर्शन” हा लोक कल्याणकारी विचार राष्ट्राला दिला. पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी “एकात्म मानवदर्शन” हा विचार विशद करणारी व्याख्याने दिली होती. त्यास सन २०२५ यावर्षी ६० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त या हीरक महोत्सवी वर्षामध्ये महाविद्यालय स्तरावर पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

१. एकात्मिक मानवतावाद याविषयावर निबंध, भाषण, वादविवाद, पथनाट्ये, काव्यलेखन या स्पर्धांचे आयोजन करावे.
२. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकरिता एकात्मिक मानवतावाद याविषयावर शॉर्ट फिल्मस, रील्सचे आयोजन करण्यात यावे.
३. पं.दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती (दि.२६/१२/१९१६) आणि त्यांचा स्मृतीदिन (दि.११/०२/१९६८) असून यादिवशी देखील विविध व्याख्याने, कार्यक्रम यांचे आयोजन करावे.
४. विविध कार्यक्रमांचे आयोजन व समन्वय साधण्यासाठी महाविद्यालय स्तरावर एका प्रभारी प्राध्यापकाची नियुक्ती करावी.
५. प्रत्येक उपक्रमामध्ये रासेयोचे पूर्ण एकक आणि महाविद्यालयातील किमान ३५% विद्यार्थी सहभागी होतील यादृष्टीने प्रयत्न करावेत आणि सहभागी विद्यार्थ्यांची नोंद ठेवण्यात यावी.
६. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, विजेत्यांना बक्षिसे आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे देण्यात यावीत.
७. महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनावरील संबंधित साहित्याचा स्वतंत्र विभाग करून विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त करावे.
८. उपरोक्त कार्यक्रमांचा खर्च संबंधित महाविद्यालयांनी करावा.

तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सदर कार्यक्रमाबाबत माहिती देऊन जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी होण्याबाबत सूचित करावे. सदरचे कार्यक्रम दि. २२ एप्रिल २०२६ पर्यंत सुरू राहतील याप्रमाणे नियोजन करावे. आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक माहितीकरिता : मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र

HEPN-MVI1011(CLR)/37/2025-COLLWG1

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 357
I/1360136/2025
दिनांक 11 AUG 2025
राष्ट्रीय सेवा योजना

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,


४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


क्र.: उशिसं/मवि-१/एकात्म मा. दर्शन हि. महो/२०२५/ई. २०३९५२९ दि. ०६/०८/२०२५

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य.

२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

आवक क्र. 4942
दिनांक : 09.08.2025
जावक दिनांक 09.08.2025
विभाग :

विषय:- एकात्म मानवदर्शन हया हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे व्यापक स्तरावर आयोजन करण्याबाबत.

संदर्भ:- मा. राज्यपाल यांचे अवर सचिव, राज भवन, यांचे पत्र क्र.RB/Edn.I/Gen-२०२५/CR-११९/४९३/दि.५.६.२०२५

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना लिहिलेले संदर्भांकित पत्र कृपया अवलोकनी घ्यावे. (सुलभ संदर्भासाठी पत्राची प्रत सोबत)

युवा वर्गाच्या सक्षम व प्रभावी सहभागावर सामर्थ्यशाली राष्ट्राची निर्मिती अवलंबून असते. जगभरात सर्वात जास्त युवा वर्ग असणाऱ्या भारत देशातील युवा वर्गास त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन देणे व त्यांना राष्ट्रनिर्माण कार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. याच जाणिवेतून पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित "एकात्म मानवदर्शन" हा लोक कल्याणकारी विचार राष्ट्राला दिला. पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी " एकात्म मानवदर्शन " हा विचार विशद करणारी व्याख्याने दिली होती. त्यास सन २०२५ यावर्षी ६० वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्त या हीरक महोत्सवी वर्षामध्ये विद्यापीठ /महाविद्यालय स्तरावर आयोजित करावयाच्या कार्यक्रमासाठी पुढील सूचना देण्यात आलेल्या आहेत.

NSS/BSD १. एकात्मिक मानवतावाद - निबंध, भाषण, वादविवाद, पथनाटये या विषयावर स्पर्धा आयोजित करणे. तसेच शॉर्ट फिल्मस, रील्स आणि काव्यलेखन इ.

plz do the needful.

२. विविध कार्यक्रमांचे आयोजन व समन्वयन साधण्यासाठी विद्यापीठ स्तरावर तसेच महाविद्यालय स्तरावर एक प्रभारी प्राध्यापकाची नियुक्ती करावी.

३. किमान ३५ % विद्यार्थी सहभागी होतील यादृष्टीने प्रयत्न करावेत आणि सहभागी विद्यार्थ्यांच्या तपशीलवार नोंदी ठेवण्यात याव्यात.

४. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र, विजेत्यांना बक्षिसे आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे देण्यात यावीत.

५. विद्यापीठ स्तरावर एकात्मिक मानवतावादावर एक अध्यासन स्थापन करण्यात यावे.

६. पं. दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती (२६.१२.१९१६) आणि त्यांचा स्मृतीदिनी (११.२.१९६८) देखील विविध व्याख्याने, कार्यक्रम यांचे आयोजन करावे.

७. विद्यापीठ/ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवनावरील संबंधित साहित्याचा स्वतंत्र विभाग करुन विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त करावे.

८. सदरचे उपक्रम दि.२२ एप्रिल २०२६ पर्यत सुरू राहतील, या दिशेने नियोजन करावे.

९. उपरोक्त कार्यक्रमांचा खर्च संबंधित संस्थां/ महाविद्यालये यांनी करावा.

उपरोक्त सूचनांप्रमाणे सर्व अकृषी/अभिमत/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे,/ शैक्षणिक संस्था / संलग्नित महविद्यालये यांमध्ये एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सवी कार्यक्रमाचे व्यापक प्रमाणात आयोजन करण्यात यावे.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 06-08-2025 13:38:17

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

GOVERNOR'S SECRETARIAT
RAJ BHAVAN
MALABAR HILL
MUMBAI 400 035

NO. RB/Edn.1/Gen-2025/CR-119/493

5, June 2025.

To,

**All Vice Chancellors of State Universities.**

Subject: Student Engagement Initiatives on Integral Humanism -

This year marks the Diamond Jubilee of Pt. Deendayal Upadhyay ji's visionary lectures on Integral Humanism (22-25 April 1965), a philosophy rooted in Indian values and holistic development. Pt. Deendayal Upadhyay ji, a scholar and nationalist, advocated balanced development with focus on the last person in society.

The Government of Maharashtra has formed a Diamond Jubilee Committee on Integral Humanism to commemorate programs state-wide. The inaugural event was held on 22nd April 2025 at Ruia College, Mumbai. All universities and colleges are urged to participate in this initiative to instill national pride and the spirit of Vasudhaiva Kutumbakam. Ensure that necessary action is taken on the enclosed activities and implemented effectively throughout the academic year.

With regards.

5/6/2025

**(Vikas Kulkarni)**
I/c Under Secretary to the Governor (Edn.)

**Enclosure: Action Points for Integral Humanism Diamond Jubilee Activities (2025-2026)**

1. Organize competitions on Integral Humanism-Essay, Elocution, Debate, Street Plays, Short Films, Reels, and Poetry.

6:32 5G

All Vice Chancellor of State... Done



(Vikas Kulkarni)
I/c Under Secretary to the Governor (Edn.)

**Enclosure: Action Points for Integral Humanism Diamond Jubilee Activities (2025-2026)**

1. Organize competitions on Integral Humanism-Essay, Elocution, Debate, Street Plays, Short Films, Reels, and Poetry.
2. Appoint a Professor-in-Charge in each university/college to coordinate the program.
3. Ensure at least 35% student participation; maintain detailed participation records.
4. Certificates to all participants; prizes and merit certificates to winners.
5. Establish a Chair on Integral Humanism at the university level.
6. Observe birth (25/12/1916) and death anniversaries (11/02/1968) of Pt. Deendayal Upadhyay ji through appropriate events.
7. Stock relevant literature on Pt. Deendayal Upadhyay ji in all institutional libraries.
8. Activities to continue till 22nd April 2026.
9. All related expenses shall be borne by the respective institutions.